# रॉंग नंबर

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© **पुनरारंभ**

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# रॉंग नंबर

दुपारी दोन अडीच वाजणेची वेळ. नुकतेच दुपारचे जेवण उरकून थोडीशी वामकुक्षी करावी म्हणून कोचावर डोळे मिटून पहुडलो. दुपारची वेळ असल्याने सर्वदूर साधारण शांतता होती. घरातील सर्व जण आपापल्या कामाला गेलेले. मुले शाळेत गेलेली. रस्त्यावरून एकादे वाहन गेले तर त्याचा झालेला आवाज एवढाच काय तो अपवाद. बाकी सर्व शांत. अशा शांत वातावरणात थोडीशी डुलकी लागणे सहाजिकच नाही का ?

तितक्यात ट्रींग ऽ ऽ ट्रींग ऽ ऽ आवाज करित टेलीफोन खणाणला. खरेतर झोपेची गुंगी इतकी चढली होती की उठून फोन उचलणे जरा जिवावरच आले होते. पण कोणीतरी काही तरी आपल्याशी जरूरीचे किंवा महत्वाचे काम असल्याशिवाय आपणास अशावेळी फोन करणार नाही या प्रामाणिक विचाराने फोन घेण्यासाठी उठलो. फोनजवळ जाउन रिसीव्हर उचलण्याचे आतच फोन बंद झाला. परत येउन सोफ्यावर बसणार तितक्यात ट्रींग ऽ ऽ ट्रींग ऽ ऽ आवाज करित परत फोन खणाणला. न उचलावा तर सारखा आवाज चालू राहिल व आवाजाने झोप लागणार नाही शिवाय पलीकडे कोण आहे व त्याचे काय काम आहे हे समजल्याशिवाय चैन पडणार नाही या विचाराने फोन घेण्यास उठलो तर पुन्हा तीच पुनरावृत्ती. रिसीव्हर उचलण्याचे आधीच फोन बंद. मनात फोन करणाराबद्दल संताप आला. जर एवढे जरूरीचे काम आहे तर पाच दहा सेकंद फोन उचले पर्यंत थांबता येत नाही का? निष्कारणच दुस-याला त्रास देण्याची प्रवृत्ती. आता परत फोन आला तर एकतर उचलायचा नाही कींवा उचलला तर काही बोलायचे नाही असे मनाशी ठरविले व सोफ्यावर आसनस्थ झालो.

अपेक्षे प्रमाणे परत टेलीफोनची घंटा वाजली. न राहवून व ठरविलेले सर्व विसरून "हॅलो" म्हणत रिसीव्हर उचलला. पंधरा वीस सेकंद प्रतिक्षा करून पलिकडून कोणताही प्रतिसाद न आलेमुळे मी फोन ठेवला. म्हणाल तर घटना तशी करिकोळ सर्व सामान्यांना नेहमी सामोरी जावी लागणारी. पण निष्कारणच मानसिक त्रास कीती ?

आजकाल टेलीफोन असणे किंवा मोबाईल बाळगणे चैनीची वस्तु नाही. ही आजकालच्या धकाधकीच्या जिवनात गरज झाली आहे. परंतु याचे महत्व ज्याला समजले तोच याचा वापर योग्य प्रकारे करतो बाकी सारे याकडे केवळ चैनीची वस्तु किंवा शौक म्हणून वापरतो. टेलीफोन किंवा मोबाईल ही संदेश दळण वळणाची साधने आहेत. आज आपण घर बसल्या साता समुद्रापार असलेल्या मित्राशी नातेवाईकांशी टेलीफोन किंवा मोबाईल वरील बटने दाबून थोडयाशा अवधित संपर्क करू शकतो. संकटकाळी एकमेकास संदेश देउा शकतो, संदेश घेउ शकतो. ही सर्वात महत्वाची व आवश्यक सुविधा.

पण आजकाल नुसता मिसकॉल देणे फॅशन झालीय. कां ? तर म्हणे केवळ संकेत म्हणून अथवा टेलिफोन वर होणारा खर्च वाचापा म्हणून. बरे फोन केल्यावर किंवा आल्यावर महत्वाचे सोडून अन्य किंवा त्याच त्याच विषयावर तासन तास बोलत राहणे हे कितपत योग्य आहे ? यात आपण आपला वेळ व पैसा वाया घालवित आहोत असे वाटत नाही कां ? टेलीफोन केवळ संदेश वहनाचे साधन आहे यात मोजके व महत्वाचे बोलणे याला फार महत्व आहे. नेमके याच वेळी जर अन्य तिसरी व्यक्ती उभयतापैकी कोणाशीही बोलू इच्छिल्यास बोलू शकत नाही. “आपण संपर्क करू इच्छिणारी व्यक्ती दुस–या अन्य व्यक्तीशी बोलत आहे. कृपया प्रतिक्षा करा अथवा थोडयावेळाने प्रयत्न करा.” असा ध्वनिमुद्रित टेप ऐकत प्रतिक्षा करण्या पलिकडे पर्याय नसतो. पर्यायी महत्वाच्या कामास विलंब होतो.

एवढेच नव्हे तर फोन वर बोलणारांची भाषा पण कित्येक वेळी असभ्यपणाची असते. आपण सार्वजनिक ठिकाणी उभे आहोत व तेथून संभाषण चालू आहे. आपले संभाषण कळत न कळत इतरांचे देखील कानी पडते आहे याचे त्यांना भान नसते. आपली वाणी इतरांना ऐकण्यास गोड वाटावी याचे भान ठेवल्यास निश्चितच आपले बद्दल इतरांचे मनात आदर निर्माण होईल.

या बरोबर चुकीचे नंबर देखील वारंवार लागतात. याने देखिल मनस्ताप होत असतो. आपण दूरदर्शनवर आवडती मालीका अथवा चित्रपट पाहत असतो. पडद्यावरील कथा रंगात आलेली असते. पुढील क्षणी काय होईल याची उत्सुकता लागलेली असते. मन एकाग्र झालेले असते. याचवेळी टेलीफोनची घंटी वाजते. रिसिव्हर उचलल्यावर समजते कीं, पलीकडील व्यक्तीला अपेक्षित

व्यक्ती नसते किंवा चुकीचा नंबर लागला असतो. अशावेळी कार्यक्रम पाहण्याचा रसभंग होतो व रोष व्यक्त करण्यापलीकडे काहीच करू शकत नाही. जर डायल करणे पुर्वी फिरविणारा नंबर व्यवस्थित तपासला तर चुकिचा नंबर म्हणून पलिकडच्या व्यक्तीचा रोष ओढवून घेत नाही वेळ पैसा व त्यावर खर्ची झालेले थोडेफार श्रम देखिल वाचतात.

पण कधी कधी असा चुकीचा नंबर देखिल मनास आनंद देउन जातो. या बाबतीत माझ्या बद्दल घडलेला अनुभव जरा मजेशीरच आहे. सकाळची वेळ मी काम आटोपून वर्तमान पत्र वाचण्याचा आनंद घेत होतो. फोन खणाणला. तिकडून एक गोड बालमधूर आवाज आला "हॅलो", मी स्वीटी बोलतेय, पिंकीताई  आहे का ? " लहान मुलीचा गोड आवाज ऐकून मला नवल वाटले. तिच्या आवाजावरून ती ४/५ वर्षाची लहान मुलगी असावी असा अंदाज आला. मी तिला बोलते करित सहजच म्हणालो "पिंकी बाहेर गेली आहे. येईलच थोडया वेळाने काही सांगायचे काय तिला ? " " हो, काका ,  परवा माझा वाढदिवस आहे. तिला म्हणावे तुला जरूर बोलावले आहे. मी तिची वाट पाहिन. तिला सांगा बर्थडे झाल्यावर आम्ही बागेत खेळायला जाणार आहोत." इति स्वीटी. मी तिला तिचा नाव व पत्ता विचारला. "स्वीटी देशपांडे, पालीका बागेच्या मागे नागपूर". तिचे बालमन नाराज होउ नये म्हणून मी तिचेशी बोलत राहिलो. मधूनच अगं स्वीटी कोण आहे ? कोणाशी बोलते आहे ? असा आवाज आला. मी तिला तिच्या आईला फोन देण्यास सांगितले. तिच्या आईला माझी ओळख करून देत हा चुकीचा नंबर असल्याचे सांगितले व सोबत स्वीटीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यास विसरलो नाही. बोलता बोलता केवळ तिचे बालमन नाराज होउ नये म्हणून मी तिचेशी बोललो याची त्यांना कल्पना दिली. यानंतर वाढ दिवस झालेवर आमचे सविस्तर बोलणे झाले व आज देखील अधून मधून होत असते. महत्वाचे म्हणजे मी या देशपांडे कुटुंबियांना प्रत्यक्ष पाहिले नाही किंवा भेटलो नाही त्यांनी पण मला प्रत्यक्ष पाहिले नाही किंवा भेटले नाही. केवळ चुकिचा नंबर लागले मुळे आमची भेट झाली व मला चांगली एक बालमैत्रिण मिळाली. हे काय कमि आहे.  मी केवळ चुकिचा नंबर म्हणत फोन ठेउन दिला असता तर माझ्या शुभेच्छा तिच्यापर्यंत पोचू शकल्या नसत्या. केवळ शुभेच्छाने ती किती आनंदित झाली ते तिच्या बोलण्यावरून समजते.  आज मी एका लहान जिवाला आनंद दिल्याचाच फार मोठा आनंद मला पण मिळाला.